## प्रकरण – एक

# प्रास्ताविक

# प्रकरण – एक

## प्रास्ताविक

१.१ प्रस्तावना
१.२ संशोधन समस्येची पार्श्वभूमी
१.३ संशोधन समस्येचे शब्दांकन
१.४ संशोधन विषयाचे महत्व
१.५ संशोधनाची उद्दिष्टये
१.६ संशोधनाच्या मर्यादा
१.७ संशोधन पध्दती
१.८ प्रकरणीकरण
१.९ समारोप

=-=-=-=-=-=-=-=

# प्रकरण - एक

## प्रास्ताविक

### १.१ प्रस्तावना :-

वैज्ञानिक व इतर क्षेत्राप्रमाणेच शैक्षणिक क्षेत्रात देखील अनेक अडचणी व समस्या पुढे येत असतात. उद्दिष्ट संपादन करण्याकरिता या समस्यांचे विश्लेषण करुन त्यांच्या निराकरणाचे उपाय शोधणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध पैलुशी संबंधित सुधारणेच्या कामी आवश्यक नियम, उपयुक्त पध्दती आणि तत्वांचा शोध घेणे हे शैक्षणिक संशोधनाचे प्रमुख ध्येय आहे. शिक्षण प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे शैक्षणिक संशोधनाव्दारे सापडणे शक्य आहे. अशा संशोधनात नियोजनपूर्वक व पध्दतशीरपणे आवश्यक माहिती गोळा करुन व तिचे शास्त्रशुध्द विवेचन करुन विद्यमान समस्येचे निराकरण करण्यासाठी विश्वसनीय उपाय शोधून काढले जातात.

प्रस्तुत शोध प्रबंधाची समस्या ही शिक्षण प्रक्रियेशी संबंधीत असून तिचे विश्लेषण करुन तिच्या निराकरणाचे उपाय शोधण्याच्या नियोजनपूर्वक शास्त्रशुध्द प्रयत्न केलेला आहे.

### १.२ संशोधन समस्येची पार्श्वभूमी :-

पाठयपुस्तक हे कोणताही विषय शिकविण्याचे प्रभावी साधन आहे. त्याचा अध्यापक आणि विद्यार्थी या दोघांनाही फार उपयोग होतो. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाने डॉ. ईश्वरभाई पटेल समीक्षण समितीच्या [१९७७-७८] शिफारशीनुसार इयत्ता आठवी ते दहावीच्या अभ्यासक्रमाचा व त्याच्या उद्दिष्टांचा नव्याने विचार करुन, समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांच्या गरजा,

त्यांचा वयोगट, त्यांची आकलन शक्ती लक्षांत घेऊन अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली आहे. जून १९८२ पासून इयत्ता आठवी, जून १९८३ इयत्ता नववी, या क्रमाने नवीन पाठ्यपुस्तके निर्धारित करण्यात आली. त्यानुसार इयत्ता दहावीचे इतिहास विषयाचे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही समाजवादास योग्य अशी मनोवृत्ती निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना गतिमान जीवनाची मूल्ये कळावीत, त्यांची अस्मिता जागी होऊन त्यांचे जीवन प्रगत मूल्यांनी समृध्द व्हावे, तो निर्भय बनावा, त्याला भूत, वर्तमान, भविष्य या तीन काळाचे यथार्थ आकलन व्हावे, राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, सर्वधर्मसमभाव ही मूल्ये त्याच्या ठायी येऊन तो सुजाण नागरिक बनावा हा इतिहास शिक्षणाचा नवा दृष्टीकोन पुढे ठेवून दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन करण्यात आले आहे.

पण आज इतिहास अध्यापन-अध्ययनात हा इतिहास शिक्षणाचा नवा दृष्टीकोन अध्यापक व विद्यार्थी यांच्याकडून जोपासला जात नाही असे दिसून येते. पाठ्यपुस्तकाचा उपयोग फक्त पास होण्यासाठी व पास करण्यासाठी होत आहे. "पास होणे – फारतर गुणवत्तेने पास होणे – नंबरात येणे" यासाठीच पाठ्यपुस्तक प्रश्नोत्तर रुपाने अध्यापक – विद्यार्थी या ज्ञात होत चालले आहे. यातूनच पाठ्यपुस्तक मागे पडून प्रश्नोत्तरे हे लेखी परीक्षेचे मूलमंत्र घेऊन मार्गदर्शिका अवतरल्या. व त्यानीच पाठ्यपुस्तकाची जागा घेतली. विद्यार्थी जगतात मार्गदर्शिका या शब्दाऐवजी "गाईडस" हा शब्द रुजला, वाढला आणि फोफावला. सर्वजण त्याच्या छायेतच शैक्षणिक जीवनांचा आनंद लुटू लागले.

"मुलगा गुणवान बनण्यापेक्षा त्याला चार अधिक गुण परीक्षेत कसे मिळतील" हाच व्यावहारिक विचार पालक, अध्यापक, मुख्याध्यापक

आणि समाज करत आहे. अध्यापन-अध्ययनासाठी अभ्यासपूर्ण तयार केलेल्या पाठ्यपुस्तकापेक्षा मार्गदर्शकाचाच उपयोग अधिक होऊ लागला आहे. तेव्हां ही परिस्थिती समजावून घेऊन त्यासंबंधी कारणमीमांसा करणे अगत्याचे वाटल्याने या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

प्रस्तुत संशोधक इतिहास विषयाचा पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला आहे. त्याशिवाय गेली कित्येक वर्षे इतिहास हा विषय शिकवित आहे. त्यामुळे इतिहास विषय त्याच्या जिव्हाळ्याचा आहे. या विषयाची संशोधनासाठी निवड करण्याचे हेही एक प्रमुख कारण आहे.

## १.३ संशोधन समस्येचे शाब्दांकन :-

प्रस्तुत समस्येचे शाब्दांकन खालील प्रमाणे केले आहे.

" माध्यमिक शाळेतील इतिहासाच्या अध्ययन-अध्यापनातील पाठ्यपुस्तक आणि मार्गदर्शकाच्या उपयोगाचा चिकित्सक अभ्यास"

प्रस्तुत संशोधनाच्या विधानात वापरलेल्या विविध संज्ञाच्या स्पष्टीकरणासाठी त्यांच्या पुढील प्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत.

### माध्यमिक शाळा :-

माध्यमिक शाळा या संज्ञेत आठवी, नववी, दहावी या वर्गाचा समावेश होतो. तथापि नवीन अभ्यासक्रमाच्या नवीन आकृतीबंधानुसार नववी व दहावी हे दोनच वर्ग माध्यमिक मानले आहेत. प्रस्तुत समस्येच्या संशोधनासाठी निवडलेल्या माध्यमिक शाळा, वर्ग आणि विषय याचे विवेचन संशोधनाची मर्यादा या सदरात याच प्रकरणात १.६ मध्ये दिलेले आहे.

इतिहास :-

इतिहास म्हणजे माध्यमिक शाळांतील इयत्ता दहावीच्या विषयापैकी एक विषय या अर्थाने हा शब्द प्रयोग वापरला आहे.

अध्ययन :-

इतिहास विषय म्हणून विद्यार्थी अभ्यास करताना व शिकत असताना याअर्थी अध्ययन हा शब्दप्रयोग वापरला आहे.

अध्यापन :-

इतिहास हा विषय शिकवत असताना याअर्थी अध्यापन हा शब्दप्रयोग वापरला आहे.

पाठ्यपुस्तक :-

अभ्यासाची पुनर्रचना करुन महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ०१० यांनी इतिहास शिक्षणाचा नवा दृष्टीकोन पुढे ठेवून इतिहास विषयाला इयत्ता दहावीला जे पुस्तक तयार केले ते पाठ्यपुस्तक या अर्थाने हा शब्दप्रयोग वापरला आहे पाठ्यपुस्तका विषयी सविस्तर माहिती प्रकरण तीन मध्ये दिली आहे.

मार्गदर्शक :-

इयत्ता दहावीच्या पाठ्यपुस्तकाच्या पाठ्यांशावर आधारित पण एस. एस. सी. बोर्डाच्या लेखी परीक्षेचे स्वरुप लक्षात घेऊन प्रश्नोत्तर रुपाने खाजगी प्रकाशकांनी जी गाईडस् प्रकाशित केली आहेत व करत आहेत त्याच अर्थाने ही संज्ञा वापरली आहे.

चिकित्सक अभ्यास :-

चिकित्सक अभ्यास म्हणजे सूक्ष्म, सांगोपांग, तपशीलवार, समीक्षणात्मक अभ्यास असा अभ्यास की, ज्यामध्ये इतिहास पाठ्यपुस्तक व

मार्गदर्शक याचा अध्यापन-अध्यनातील उपयोगाची कारणे जाणून त्यावर उपाययोजना सुचविली आहे.

१.४ <u>संशोधन विषयाचे महत्व :-</u>

माध्यमिक शाळामध्ये १३ ते १५ वर्षे वयोगटाच्या मुला मुलींच्या अध्ययनासाठी फार जागरूकतेने अध्यापकांना अध्यापन करावे लागते. दरवर्षी पास होऊन वरच्या वर्गात जाताना त्यांनी काही मुलभूत गुण, संस्कार, मूल्ये व्यक्तिमत्वाचा एक अविभाज्य गुण म्हणून न्यावीत ही रास्त भूमिका पाठयपुस्तकाचे अध्यापनाने व अध्ययनाने करावी, हा दृष्टीकोन पुढे ठेवून पाठयपुस्तकांचे लेखन केलेले असते. पण आजकाल विपरितच घडत असल्याचे दिसते. पाठयपुस्तकापेक्षा त्याच्या मार्गदर्शिकाचाच उपयोग अध्यापनात अध्यापक व अध्ययनात विद्यार्थी करत आहेत. "प्रश्न आणि त्याचे उत्तर" हाच अध्यापन-अध्ययनाचा आत्मा बनला आहे. पालकही परिस्थितीला शरण जाऊन तोही ह्या वाईट सवयीचा मालक बनला आहे. एकंदरीत पाठयपुस्तकापेक्षा मार्गदर्शकच आपला त्राता अशी भूमिका अध्यापक, विद्यार्थी व पालक यांची झालेली आहे. पाठयपुस्तकापेक्षा त्याच्या मार्गदर्शिका ह्यानी एकूण अध्ययन-अध्यापन प्रक्रिया व्यापली आहे. या एकंदरीत परिस्थितीच्या कारणाचा शोध विद्यार्थी, अध्यापक व पालक या तीन स्तरावर घेणे महत्वाचे आहे. प्रस्तुत शोध प्रबंधात इतिहास विषयाच्या अध्यापन-अध्ययनात पाठयपुस्तक व मार्गदर्शक यांच्या उपयोगाच्या कारणांचा चिकित्सक अभ्यास केला आहे.

इतिहास अध्यापकाला अध्यापनात पाठयपुस्तकाचा वापर करण्यात कोणत्या अडचणी येतात, पाठयपुस्तक लेखनात कोणते दोष आहेत, मार्गदर्शक, अध्यापक व विद्यार्थी पाठयपुस्तकापेक्षा अनुक्रमे अध्यापन व अध्ययनासाठी जास्त वापरामागील कारणांचा शोध घेणे, शिवाय यासंबंधी पालकांचाही दृष्टीकोन समजावून घेणे इत्यादींचा विचार प्रस्तुत शोध प्रबंधात केला असल्याने संशोधनाला वास्तवतेचा आधार मिळेल.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाने अध्ययन-अध्यापनात पाठ्यपुस्तकाचा वापर परिणामकारक करण्याच्या दृष्टीने व पाठ्यपुस्तक लेखनाचे स्वरूप बदलण्याच्या दृष्टीने निश्चितच मदत होईल.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाने इतिहास शिक्षणाचा नवा दृष्टीकोन पाठ्यपुस्तकाच्या अध्यापन-अध्ययनातील उपयोगानेच सफल होईल असे प्रस्तुत संशोधकास वाटते.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टये :-

प्रस्तुत संशोधनाची पुढील उद्दिष्टये आहेत.

[१] विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक व मार्गदर्शकाचा अध्ययन-अध्यापनातील उपयोगाचा चिकित्सक अभ्यास करणे.

[२] पाठ्यपुस्तकापेक्षा मार्गदर्शक अधिक उपयुक्त होण्याच्या महत्वाच्या घटकांचा शोध घेणे.

[३] पाठ्यपुस्तकाच्या स्वरूपाबाबत दुसरा पोषक पर्याय सुचविणे.

## १.६ संशोधनाच्या मर्यादा :-

हे संशोधन कराड नगरपालिकेच्या क्षेत्रापुरतेच मर्यादित आहे. सबब संशोधनामध्ये कराड नगरपालिकेच्या सरहद्दीतील एकूण सात माध्यमिक शाळांचा समावेश केला आहे.

[१] टिळक हायस्कूल, कराड

[२] कन्या शाळा, कराड

[३] यशवंत हायस्कूल, कराड

[४] श्री. शिवाजी विद्यालय, कराड

[५] विठामाता विद्यालय, कराड

[६] श्री. संततुकाराम हायस्कूल, कराड

[७] महाराष्ट्र हायस्कूल, कराड

वरील माध्यमिक शाळातील इयत्ता दहावीचा वर्गच संशोधना- साठी निवडला आहे. दहावीचा वर्ग माध्यमिक शालान्त परीक्षेला बसणारा वर्ग म्हणून हाच वर्ग समस्येच्या अभ्यासासाठी निवडला आहे. हे संशोधन इतिहास विषयाच्या पाठ्यपुस्तकाचा व मार्गदर्शकाचा अध्यापन - अध्ययनात होणाऱ्या उपयोगापुरते मर्यादित आहे.

१.७ संशोधन पध्दती :-

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडीत असल्याने सर्वेक्षणात्मक पध्दती वापरली आहे. प्रस्तुत संशोधन विषयाच्या समस्याच्या संदर्भात सद्य:स्थिती कोणती आहे. हे जाणून घेण्यासाठी ही संशोधन पध्दती उपयोगी ठरणार आहे. संशोधनासाठी आवश्यक सामुग्रीच्या संकलनासाठी

[१] प्रश्नावली
[२] मुलाखती
[३] चर्चा
[४] निरीक्षण

या शैक्षणिक संशोधन साधनांचा वापर केला आहे. सर्वेक्षण पध्दतीच्या आधारे मिळालेल्या सामुग्रीचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण व मुल्यांकन केले असून चांगल्या बदलासाठी शिफारशी करण्यात आल्या आहेत.

प्रस्तुत शोध प्रबंधाचे दोन भाग पडतात.

[१] इतिहास विषयाच्या अध्यापन - अध्ययनात पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या वापराचा सर्वेक्षण करुन आढावा घेणे.

[२] संकलित झालेल्या माहितीचे विश्लेषण, विवरण करुन निष्कर्ष व शिफारशी करणे.

पहिल्या भागाचे पुन्हा तीन उपविभागात वर्गीकरण केले आहे. पहिल्या उपविभागात इतिहास अध्ययनातील पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक

यांच्या वापराचा "विद्यार्थी प्रश्नावली" व्दारा आढावा घेतला. दुसऱ्या उपविभागात इतिहास अध्यापनात पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या वापराचा "अध्यापक प्रश्नावली" व्दारा आढावा घेतला आणि तिसऱ्या उपविभागात पाठ्यपुस्तक आणि मार्गदर्शक यांचा इतिहास अध्यापन अध्ययनातील वापराचा पालकांचा दृष्टीकोन "पालक प्रश्नावली" व्दारा समजावून घेतला आहे.

विद्यार्थी प्रश्नावली, अध्यापक प्रश्नावली आणि पालक प्रश्नावली अनुक्रमे परिशिष्ट "अ, ब, क" मध्ये दिलेल्या आहेत. या तिन्ही प्रश्नावलीतील काही प्रश्न बंदिस्त स्वरूपाचे, काही मुक्त आणि बरेचसे प्रश्न संमिश्र स्वरूपाचे आहेत.

या तिन्ही प्रश्नावलीचे विश्लेषण व त्या व्दारे गोळा केलेल्या माहितीचे सविस्तर विवरण प्रकरण क्रमांक चार "संशोधन पध्दती" यामध्ये दिलेले आहे.

वरील प्रश्नावली व्दारा गोळा केलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी प्रस्तुत संशोधकाने काही विद्यार्थी, अध्यापक व पालक यांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. तसेच सात माध्यमिक शाळांना प्रत्यक्ष भेटी देवून तत्स्थळी निरीक्षण केले.

१.८ <u>प्रकरणीकरण</u> :-

वरील परिच्छेदातून वर्णन केलेल्या साधनांच्या साहाय्याने गोळा केलेल्या सामग्रीचे विश्लेषण, वर्गीकरण करून तसेच आवश्यक तेव्हा सांख्यिकी परिमाणे वापरून अन्वयार्थ लावलेला आहे. अन्वयार्थावर आधारित निष्कर्ष काढलेले असून त्याप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत. या सर्वांचे पुढे दिल्याप्रमाणे सहा प्रकरणात विभाजन केलेले आहे.

**प्रकरण एक :- प्रास्ताविक -**

या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधन अभ्यासाची गरज का वाटली याचा उहापोह केलेला आहे. तसेच संशोधन समस्येचे शब्दांकन करुन प्रस्तुत संशोधनाच्या विधानात वापरलेल्या महत्वाच्या विविध संज्ञांचे स्पष्टीकरण केले आहे, संशोधनाचे महत्व, त्याची मर्यादा व व्याप्ती, संशोधनाची उद्दिष्टये स्पष्ट केली आहेत. थोडक्यांत हे प्रकरण संशोधनाची पार्श्वभूमी स्पष्ट करते.

**प्रकरण दोन - संशोधन विषयाशी संबंधित संशोधन साहित्याचा मागोवा :-**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. हा आढावा सैध्दान्तिक पार्श्वभूमी म्हणून उपयुक्त आहेच, परंतु त्यापेक्षा संशोधन विषयाशी संबंधित आत्तापर्यंत या क्षेत्रात कोणते संशोधन झाले आहे, कोणत्या प्रकारची सामग्री गोळा करण्यात आली, त्यासाठी कोणती साधने वापरण्यात आली, गोळा केलेल्या सामग्रीचे क्शाप्रकारे वर्गीकरण विश्लेषण करण्यात आले, अन्वयार्थ कसा लावण्यात आला आणि कोणते निष्कर्ष काढण्यात आले, कोणत्या शिफारशी करण्यात आल्या याविषयी उहापोह केलेला आहे. त्यामुळे हे प्रकरण प्रस्तुत संशोधकाला प्रस्तुत संशोधन कशा प्रकारे करावे याविषयी मार्गदर्शनपर ठरले आहे.

**प्रकरण तीन - समाजजीवन शास्त्र, पाठ्यपुस्तक, परीक्षा पध्दती, मार्गदर्शक :-**

प्रस्तुत प्रकरणात समाजजीवन शास्त्र किंवा समाजशास्त्र म्हणजे काय ? त्यात समाविष्ट होणारे विषय, त्या विषयांना परीक्षेतील गुण आणि अध्यापनासाठी त्या विषयांना दिलेल्या तासिका इत्यादींची चर्चा केली आहे.

इयत्ता दहावीचे इतिहासाचे पाठ्यपुस्तक, त्याचे स्वरूप, त्याची उपयुक्तता, ते लिहीण्यासाठीमागचा नवा दृष्टीकोन, त्यात समाविष्ट केलेले घटक इत्यादी बाबींची चर्चा केली आहे.

सद्य: परीक्षेचे स्वरूप कसे आहे, त्यात कोणत्या प्रकारची परीक्षा होते. प्रश्नसंख्या, प्रश्न प्रकार, गुणादान पध्दती याविषयी सविस्तर चर्चा करून माध्यमिक शालांत परीक्षेची नमुन्या दाखल इतिहास विषयाची प्रश्नपत्रिका दिली आहे.

पाठ्यपुस्तका बरोबरच मार्गदर्शकाचे स्वरूप, त्याची रचना, त्यातील पाठ्यांश, त्याची उपयुक्तता आणि परीक्षा - मार्गदर्शक याचा अन्योन्य संबंध कसा प्रस्थापित झाला आहे. याची सोदाहरण चर्चा सदर प्रकरणात केली आहे.

प्रकरण चार - संशोधन पध्दती :-

या प्रकरणामध्ये शोध कार्यासाठी कोणत्या संशोधन पध्दतीचा उपयोग केला गेला, त्यासाठी नमुना निवड कशी केली, अध्यापन साहित्याची निर्मिती व अध्यापन कालावधी किती ठरविला आणि प्रत्यक्ष शोधकार्य कशाप्रकारे पार पाडले, मूल्यमापनासाठी कोणती साधने वापरली याची विस्तृत माहिती देण्यात आलेली आहे.

प्रकरण पांच - संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण :-

या प्रकरणामध्ये मूल्यमापन साधना व्दारे मिळालेल्या आधार सामुग्रीचे वर्गीकरण करून विश्लेषण करण्यात आले आहे. आधार-सामुग्रीचा विश्लेषणांनी अन्वयार्थ लावलेला आहे.

प्रकरण सहा - निष्कर्ष व शिफारशी :-

या प्रकरणामध्ये मूल्यमापन साधनाद्वारे मिळालेल्या आधार-सामुग्रीचे वर्गीकरण करून व विश्लेषण करून अन्वयार्थ लावल्यानंतर त्या आधारे कोणते निष्कर्ष निघतात ते स्पष्ट करून त्यावर आधारित शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रस्तुत संशोधन करताना अभ्यासकाला जाणवलेल्या आणि अशा प्रकारच्या संशोधनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश केला आहे.

१.९ समारोप :-

सदर प्रकरणात प्रस्तुत शोधप्रबंधाची पार्श्वभूमी विशद करण्यासाठी यथायोग्य आराखडा दिलेला आहे. त्यात संशोधनाची पार्श्वभूमी, संशोधन समस्येचे शब्दांकन वापरलेल्या पदांचा अर्थ - व्याख्या, संशोधनाची उद्दीष्टये, मर्यादा आणि प्रकरणीकरण याबाबींची चर्चा केलेली आहे. या प्रकरणाने प्रस्तुत संशोधनाची व्यापक कल्पना येण्यास व तिच्या संशोधन पध्दतीने संशोधनाची उकल होण्यास निश्चित मदत होते.

=-=-=-=-=-=-=-=-=